# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

**८३) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४ जानेवारी, २०२५**

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| | | |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. १९ ते २५ जानेवारी २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता आहे. |
| **पीक** | **अवस्था** | **कृषी विषयक सल्ला** |
| **सामान्य सल्ला** | | हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी **मेघदुत** मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| **संदेश** | | तण व्यवस्थापन आणि जमिनीतील ओलावा टिकून राहण्यासाठी आंतरमशागतीची कामे करून घ्यावीत. |
| तुर | पक्वता अवस्था | काढणी व साठवण: पीक कालावधी व वाणांची पक्वतेनुसार तुरीच्या शेंगा वाळल्यावर पीक कापून खळ्यावर मळणी करावी. तूर पिकाचा खोडवा घेऊ नये. खोडवा घेतल्यास वांझ रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. साठवणुकीपूर्वी ५ ते ६ दिवस चांगले उन्हात वाळवून पोत्यात किंवा कोठीत साठवावे. शक्य असल्यास कडुनिंबाचा पाला ५ टक्के प्रमाणात धान्यात मिसळून धान्य साठवावे. धान्याची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| गहु | शाखीय वाढीची | बागायत वेळेवर पेरणी –पेरणीनंतर तीन आठवड्यांनी २४ किलो नत्र प्रति एकरी द्यावे. बागायत उशिरा पेरणी - पेरणीनंतर तीन आठवड्यांनी १६ किलो नत्र प्रति एकरी द्यावे. □ |
| ज्वारी | वाढीची अवस्था | रबी ज्वारीमध्ये मावा या किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास सुरुवातीस निम अर्क ५% याची फवारणी करावी. प्रादुर्भाव जास्त झाल्यास डायमिथोएट ३० ईसी १.५ मिली किंवा थायमिथोक्झाम २५ WG ०.३ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी. |
| हरभरा | शाखीय वाढीची अवस्था | ढगाळ हवामानामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावीत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर पतंग अडकले जाऊन प्रजननास आळा बसतो. पिकात पक्ष्यांना बसण्यासाठी दर १५-२० मिटर अंतरावर पक्षी थांबे लावावेत. नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क फवारणी करावी. |
| रब्बी मका | शाखीय वाढीची | अमेरिकन लष्करी अळीचे नियंत्रण: यांत्रिक पद्धती: अंडीपुंज, समुहातील अळ्या वेचून राकेलमिश्रित पाण्यात टाकुन नष्ट कराव्यात. सामुहिकरित्या नर पतंग आकर्षित करून मारावेत. यासाठी कामगंध सापळयांचा वापर करावा. भौतिक पद्धती: पीक ३० दिवसापर्यंतचे असल्यास बारीक वाळू व चूनाचे मिश्रण ९:१ प्रमाणात पोंग्यात टाकावे. जैविक पद्धती: मेटॅरायझीयम ॲनिसोप्ली किंवा नोमुरिया रिलाई बुरशीचा ५० ग्रॅम/ १० लि पाणी याप्रमाणे वापर करावा. पिक ३ ते ४ आठवडे असताना (५% प्रादुर्भावग्रस्त झाडे) ५% निंबोळी अर्क किंवा ॲझाडीरॅक्टीन १५०० पीपीएम ५० मिली फवारावे. |
| केळी | फळ वाढीची | हिवाळ्यात बागेत रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. थंडीपासून संरक्षणासाठी केळीच्या घडास ६ % सच्छिद्रतेचे पांढ-या प्लास्टिक बॅगचे आवरण करावे. |
| पशुसंवर्धन | - | थंडीमुळे जनावरांना न्युमोनिया हा आजार होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या शरीराचे तापमान वाढते व त्यांचे खाणे-पिणे कमी होते. यासाठी थंडीपासून जनावरांचे संरक्षण करावे. थंड वाऱ्यापासून संरक्षणासाठी शेडला पडदे लावावे. |
| कुक्कुटपालन | - | थंड वातावरणात शेडमध्ये ७ दिवसांपर्यंत पक्षी व्यवस्थित ब्रूडिंग करावी. तापमान वाढवण्यासाठी जास्त व्हॅटचे बल्ब लावावेत आणि पक्षांना उर्जा व प्रथिने युक्त पशुआहाराचा समावेश करून आहार वाढवावा. |

**स्त्रोत**

१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार.

ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार
दि. : १४/०१/२०२५

स्वाक्षरीत
प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

□